RNI No. MAHBIL/2012/72704
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

भाग एक-अ– नाशिक विभागीय पुरवणी

वर्ष - १४, अंक - ४] गुरुवार ते बुधवार, ऑगस्ट ७ - १३, २०२५ / श्रावण १६ - २२, शके १९४७ [पृष्ठे ०२

प्राधिकृत प्रकाशन

जिल्हाधिकारी यांजकडून

महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) अधिनियम, १९६२

अधिसूचना

No. COLAHM-30015(16)/12/2023/Municipal Adm-I/1454637/2025.— ज्याअर्थी, महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी दिनांक ३ डिसेंबर २०१२ रोजी महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) (सुधारणा) अधिनियम, २०१२ प्रख्यापित केला होता;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) (सुधारणा) अधिनियम, २०१२ याद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) अधिनियम, १९६२ (१९६२ या महाराष्ट्र २७) च्या कलम ४ च्या खंड *(अ)* मधील उपखंड *(दोन)* व कलम ६-ब च्या खंड *(अ)* मधील उपखंड *(दोन)* नुसार महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा ३) या अन्वये गठित केलेल्या नेवासा नगरपंचायतीच्या क्षेत्राच्या बाबतीत दिनांक १ एप्रिल २०२५ पासून जमिनींचे किंवा इमारतींचे भांडवलीमूल्य मालमत्ता कराच्या आकारणीच्या मूलाधार म्हणून स्वीकारलेल्या, निवासी व निवासेतर प्रयोजनांसाठी वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरण्याचा हेतू असलेल्या जमिनींवर व इमारतींवर आकारण्यात येणाऱ्या दरांचा प्रस्ताव, नगरपालिकेकडून प्राप्त झाल्यावर, दर राजपत्रातील अधिसूचनेद्वारे अधिसूचित करण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आले आहेत.

आता त्याअर्थी, महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) (सुधारणा) अधिनियम, २०१२ याद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) अधिनियम, १९६२ च्या कलम ४ च्या खंड *(अ)* मधील उपखंड *(दोन)* व कलम ६-ब च्या खंड *(अ)* मधील उपखंड *(दोन)* अन्वये प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांना नेवासा नगरपंचायतीकडून प्रस्ताव प्राप्त झाल्याने जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांच्या कार्यक्षेत्रामधील नेवासा नगरपंचायतीच्या क्षेत्रासाठी, निवासी व निवासेतर प्रयोजनांसाठी वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरण्याचा हेतू असलेल्या जमिनींवर व इमारतींवर आकारण्यात येणाऱ्या भांडवलीकृत मूल्यावर आधारित राज्य शिक्षण उपकर व रोजगार हमी उपकर ज्या दराने नेवासा नगरपंचायतीने आकारावयाचे व गोळा करावयाचे आहेत ते दर, याद्वारे सोबतच्या अनुसूचीमध्ये नमूद केल्याप्रमाणे दिनांक १ एप्रिल २०२५ पासून अधिसूचित करीत आहे.

अनुसूची

अ. क्र.	वापर प्रकार	शिक्षण कर	रोजगार हमी उपकर
१	२	३	४
१	खुला भूखंड	०.०२ टक्के (भांडवली मूल्याच्या)	लागू नाही
२	निवासी (इमारती)	०.०२ टक्के (भांडवली मूल्याच्या)	लागू नाही
३	बिगर निवासी (इमारती)	०.१ टक्के (भांडवली मूल्याच्या)	०.०४ टक्के (भांडवली मूल्याच्या)

डॉ. पंकज आशिया,
भा.प्र.से.,
जिल्हाधिकारी, अहिल्यानगर.

अहिल्यानगर, २१ जुलै २०२५.

BY COLLECTOR

Maharashtra Education and Employment Guarantee (Cess) Act, 1962

Notification

No. COLAHM-30015(16)/12/2023/Municipal Adm-I/1454637/2025.— Whereas, the Maharashtra Education and Employment Guarantee (Cess) (Amendment) Act, 2012;

and whereas, sub-clause *(ii)* of Clause *(a)* of Section 4 and sub-clause *(ii)* of Clause *(a)* of Section 6-B of the Maharashtra Education and Employment Guarantee (Cess) Act, 1962 (Mah. XXVII of 1962) as amended by the Maharashtra Education and Employment Guarantee (Cess) (Amendment) Act, 2012, empowers the Collector to notify the rates of a tax on lands and buildings used or intended to be used for a residential and non-residential purpose to be levied with effect from 1st April 2025 in the municipal area of Nevasa Nagarpanchayat constituted under the Maharashtra Municipal Councils, Nagarpanchayats and Industrial Townships Act, 1965 by Notification in Maharashtra Government Gazette on receipt of the proposal from Nevasa Nagarpanchayat for that purpose.

Now therefore, in exercise of the powers conferred by sub-clause *(ii)* of Clause *(a)* of Section 4 and sub-clause *(ii)* of Clause *(a)* Section 6-B of the Maharashtra Education and Employment Guarantee (Cess) Act, 1962 as amended by the Maharashtra Education and Employment Guarantee (Cess) (Amendment) Act, 2012 the Collector, Ahilyanagar District upon receipt of proposal from Nevasa Nagarpanchayat hereby, notifies the rates of a tax on lands and buildings used or intended to be used for a residential and non-residential purpose, at which the State Education Cess and Employment Guarantee Cess on capital value of lands and buildings, shall be levied and collected by the Nevasa Nagarpanchayat as mentioned in the schedule appended hereto, in the municipal area within the jurisdiction of Collector, Ahilyanagar with effect from the 1st April 2025.

Schedule

Sr. No.	User Class	Education Cess	Employment Guarantee Cess
1	2	3	4
1	Open Space	0.02 percent of Capital Value	NA
2	Residential (Buildings)	0.02 percent of Capital Value	NA
3	Non Residential (Buildings).	0.1 percent of Capital Value	0.04 per cent of Capital Value.

Dr. PANKAJ ASHIYA,
(I.A.S.),
Collector, Ahilyanagar.

Ahilyanagar, 21st July 2025.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.